प्रति,

मा. जनसंपर्क अधिकारी सो, पोलीस आयुक्त कार्यालय पुणे.

यांना सविनय सादर,

रिपोर्ट :- एस. बी. तळेकर पोलीस उप-निरीक्षक चंदननगर पोलीस ठाणे पुणे.

याजकडून विनंती पुर्वक की,

**विषयः- दाखल अकस्मात मयताची माहिती वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द होणे बाबत...**

----------oooo----------

महोदय,

वरील विषयास अनुसरुन सविनय सादर करतो की, चंदननगर पोलीस ठाणे अ.म.र.नं.९२/२०१७ सी.आर.पी.सी.१७४ मधील बेवारस पुरुष वय अंदाजे ४० ते ४५ वर्षे नाव पत्ता माहित नाही हा दि.०८/०९/२०१७ रोजी १२.०० वा.चे सुमारास खराडी गाव पुणे येथील मुळा मुठा नदी पात्रामध्ये बेशुध्दावस्थेत मिळून आल्याने त्यास उपचाराकामी ससून हॉस्पीटल येथे नेले असता तो डॉक्टर तपासणीपूर्वी १९.१५ वा. मयत झाला आहे. त्याचा **MLC NO.18379/2017** असा आहे. त्याचे वर्णन खालीलप्रमाणे

एक अनोळखी पुरुष इसम वय अंदाजे ४० ते ४५ वर्षे, उंची ५फुट४ इंच, रंगाने-काळा सावळा, चेहरा-उभट, नाक-बसके, डोकीचे केस-काळे पुढील बाजूस टक्कल, अंगात-ग्रे रंगाचा निळया पट्टयाचा चेकचा फुल बाह्याचा शर्ट त्यावर काळया रंगाचे टोपी असलेला जॉकेट ०३ असे अक्षर लाल रंगात लिहिलेले, निळया रंगाची जीन्स पॅन्ट व पायात राखाडी रंगाचे ८ नंबरचे सॅण्डेल त्याचे पट्टयावर **STAREX** असे पांढ-या अक्षरात असलेले,

तरी मयताचे वारसाचा तपास होणेकामी मयताची माहिती स्थानिक वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द होण्यास विनंती आहे.